# THE BOMBAY LANDING AND WHARFAGE FEES ACT, 1882

## (Bombay VII of 1882)

## मुंबई लँडिंग व व्हार्फेज फी अधिनियम, १८८२

अनुक्रमणिका


प्रस्तावना. पान

कलमें

| | | |
|---|---|---|
| १. | लघु संज्ञा ... ... ... ... ... ... ... | ५११ |
| २. | स्थानिक व्याप्ति ... ... ... ... ... ... | ५११ |
| ३. | सन १८७९ चा मुंबईचा अधिनियम ३ रद्द करणें व बचाव ... ... | ५११ |
| ४. | 'सरकार', 'उतरण्याची जागा,' व 'उतारू' या संज्ञांची व्याख्या ... ... | ५१२ |
| ५. | सरकारनें, बंदरें वगैरेच्या हद्दी व आकारावयाची फी ठरविणें ... ... | ५१२ |
| ६. | ह्या अधिनियमाअन्वयेचे अधिकार कोणी चालवावयाचे व कर्तव्यें कोणी करावयाचीं तें. | ५१३ |
| ७. | फी गोळा करणाऱ्या अधिकाऱ्यांचे अधिकार, विशेष अधिकार व जबाबदाऱ्या | ५१३ |
| | अपराध्यांस शिक्षा ... ... ... ... ... ... | ५१३ |
| ८. | फीबद्दलची कोष्टकें लावणें ... ... ... ... ... | ५१३ |
| ९. | उप-विधि करण्याचा अधिकार ... ... ... ... ... | ५१४ |
| १०. ११. १२. | [गाळण्यांत आलीं.] | ५१४ |

# सन १८८२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७*

## (मुंबई लँडिंग व्हार्फेज फी अधिनियम, १८८२)

[१८ नोव्हेंबर १८८२]

हा अधिनियम सन १८९५ चा अधिनियम १६ याअन्वयें अंशतः रद्द करण्यांत व सुधारण्यांत आला आणि त्यांत पुढील अधिनियम व आदेश यांअन्वयें अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यांत आल्या आहेत :—

सन १९१६ चा मुंबई अधिनियम, ५.

१९१९ चा मुंबई अधिनियम, २.

१९५९ चा मुंबई अधिनियम, ५५.

भारतीय विधिअनुकूलन परिषद आदेश.

## उतरण्याच्या जागेंच्या उपयोगासाठीं फी आकारण्याबाबत अधिनियम

ज्याअर्थी, मुंबई राज्यांतील विवक्षित बंदरांतील उतरण्याच्या जागांच्या उपयोगाबद्दल फी आकारण्यासाठीं तरतूद करणें इष्ट आहे ; प्रस्तावना.

त्याअर्थी याअन्वयें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :—

१. ह्या अधिनियमास मुंबई लँडिंग व व्हार्फेज फी अधिनियम, १८८२, असें म्हणावें. लघुसंज्ञा.

२. (१) सरकार वेळोवेळीं राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें, मुंबई इलाख्यांतील ज्या बंदरास उक्त अधिनियम लागू करील त्या कोणत्याहि बंदरास तो लागू असेल : स्थानिक व्याप्ति.

परंतु, मुंबई लँडिंग व व्हार्फेज फी (एकीकरण व सुधारणा) अधिनियम, १९५९, याच्या प्रारंभानंतर तो, ज्या बंदरांत, मुंबई विलीन राज्यें विधि (अधिनियम), १९५०, अन्वयें अंमलांत असण्याचें चालू असलेले ओखा बंदर नियम, अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलांत होते त्या बंदरास ताबडतोब लागू होईल ; आणि

(२) मुंबई राज्याच्या उरलेल्या भागांतील ज्या कोणत्याहि बंदरांना सरकार, राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें तो अधिनियम वेळोवेळीं लागू करील त्या बंदरांना तो लागू होईल :

परंतु, मुंबई लँडिंग व व्हार्फेज फी (एकीकरण व सुधारणा) अधिनियम, १९५९, याच्या प्रारंभानंतर तो ज्या बंदरांत सौराष्ट्र बंदर (प्रशासन) अध्यादेश, १९५० आणि कच्छ प्रदेशास लागू केल्याप्रमाणेंचा मुंबई लँडिंग व व्हार्फेज फी अधिनियम, १८८२, हे अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलांत होते त्या बंदरांना ताबडतोब लागू होईल.

३. (१) सन १८७९ चा मुंबई अधिनियम ३ हा याद्वारें रद्द करण्यांत आला आहे व त्या अधिनियमाअन्वयें आकारण्यांत आलेली फी आणि केलेली घोषणा किंवा नेमणूक किंवा केलेला नियम हीं ह्या अधिनियमाअन्वयें आकारण्यांत आलेली फी व केलेली घोषणा किंवा नेमणूक किंवा केलेला नियम आहे असें समजण्यांत आले पाहिजे. रद्द करणें व बचाव.

(२) सौराष्ट्र बंदर (प्रशासन) अध्यादेश, १९५०, कच्छ प्रदेशास लागू असल्याप्रमाणेंचा मुंबई लँडिंग व व्हार्फेज फी अधिनियम, १८८२ आणि मुंबई विलीन राज्यें (विधि) अधिनियम, १९५०, याअन्वयें अंमलांत असण्याचें चालू असलेले ओखा बंदर नियम, याद्वारें रद्द करण्यांत येत आहेत आणि परिणामतः मुंबई लँडिंग व व्हार्फेज फी (एकीकरण) व सुधारणा अधिनियम, १९५९, याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वीं, ओखा बंदर नियमांपैकी नियम १७ अन्वयें ओखा हार्बर बोर्डाच्या सामान्य हिशोबांत शेवटीं असलेली शिल्लक रक्कम आणि कच्छ प्रदेशास लागू असल्याप्रमाणेंचा मुंबई लँडिंग व व्हार्फेज फी अधिनियम, १८८२, याच्या ११ व्या

*दिनांक १५ नोव्हेंबर १९५९ पर्यंत सुधारलेला.

कलमाअन्वयें उतरण्याच्या जागा व धक्के यांवरील फीच्या निधीच्या प्रत्येक हिशोबांत शेवटीं असलेलीं शिल्लक रक्कम राज्याच्या संचित निधीच्या खातीं जमा होईल :

परंतु, अशा रीतीनें विधि रद्द केल्यामुळें,—

(अ) अशा रीतीनें रद्द केलेल्या निधींच्या पूर्वीच्या अंमलास, किंवा त्यान्वयें योग्य रीतीनें केलेल्या किंवा करूं दिलेल्या कोणत्याहि गोष्टीस, किंवा

(ब) अशा रीतीनें रद्द केलेल्या कोणत्याहि विधीन्वयें संपादन केलेल्या कोणत्याहि हक्कास, विशेष अधिकारास, पत्करलेल्या बंधनास किंवा प्राप्त झालेल्या जबाबदारीस, किंवा

(क) अशा रीतीनें रद्द केलेल्या कोणत्याहि विधिविरुद्ध कोणत्याहि अपराधाच्या संबंधांत प्राप्त झालेल्या कोणत्याहि शास्तीस, जप्तीस किंवा शिक्षेस, किंवा

(ड) वर सांगितल्याप्रमाणेच्या अशा कोणत्याहि हक्काच्या, विशेष अधिकाराच्या, बंधनाच्या, जबाबदारीच्या, शास्तीच्या, जप्तीच्या किंवा शिक्षेच्या संबंधांतील कोणत्याहि चौकशीस, वैध कार्यवाही किंवा उपाययोजनेस बाध येणार नाहीं आणि जणुं मुंबई लँडिंग व व्हार्फेज फी (एकीकरण) व सुधारणा अधिनियम, १९५९, संमत झाला नव्हता असें समजून अशी कोणतीहि चौकशी, वैध कार्यवाही किंवा उपाययोजना करतां येईल, चालू ठेवतां येईल किंवा अंमलांत आणतां येईल, आणि अशी कोणतीहि शास्ति, जप्ति किंवा शिक्षा करतां येईल :

तसेंच अशा रीतीनें रद्द केलेल्या विधिअन्वयें केलेली कोणतीहि गोष्ट किंवा उपाययोजना (हींत काढलेली अधिसूचना, ठरविलेल्या मर्यादा, दिलेली सूट किंवा माफी, केलेले नियम, पोट-कायदे, विनियम, सोंपवून दिलेले अधिकार व केलेली नेमणूक, दिलेले अधिकार व लादलेलीं कर्तव्यें हीं, जेथवर या अधिनियमाच्या उपबंधांशीं विसंगत नसतील तेथवर त्यांचा आणि जकातीचे दर, येणें रकमा, फीं, भाडीं, पट्ट्या व बसविलेलें आकार यांचा समावेश होतो). हींत या अधिनियमाअन्वयें केलेल्या कोणत्याहि गोष्टीवरून किंवा कोणत्याहि उपाययोजनेवरून बदल किंवा सुधारणा करण्यांत येईपर्यंत किंवा ती रद्द करण्यांत येईपर्यंत अंमलांत असण्याचें चालू राहील.

"सरकार", "उतरण्याची जागा," व "उतारू" या संज्ञांची व्याख्या.

४. ह्या अधिनियमांत, मोठ्या बंदरांच्या संबंधांत "सरकार" ह्या संज्ञेचा अर्थ केंद्र सरकार असा समजावा व वर निर्दिष्ट केल्यानुसार असेल तें खेरीज करून, राज्य सरकार असा समजावा ; "उतरण्याची जागा" या संज्ञेंत बंदर, धक्का, स्तंभ, डोही (बांध), उतार (हार्ड) आणि माल उतरण्यासाठीं, जहाजांत चढविण्यासाठीं किंवा सांठविण्यासाठीं किंवा उतारूंना जहाजावर चढण्यासाठीं किंवा उतरण्यासाठीं उपयोगांत आणली जाणारी कोणतीहि जागा यांचा समावेश होतो.

आणि 'उतारू" या संज्ञेचा अर्थ, नौकाप्रमुख व खलाशी आणि मालक, त्याचें कुटुंब व नोकर यांच्याखेरीज जलयानांतून नेलेला तीन वर्षांच्या किंवा त्यांहून अधिक वर्षांच्या वयाचा इसम असा समजावा.

सरकारनें बंदरें वगैरेंच्या हद्दी व आकारावयाची फी ठरविणें.

५. सरकारानें वेळोवेळीं, राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून, पुढील गोष्टी करणें हे विधिसंमत असेल :—

(अ) ज्या बंदरास हा अधिनियम लागूं केला असेल अशा कोणत्याहि बंदराच्या हद्दी जेव्हां भारतीय बंदरांबाबत अधिनियम, १९०८, याअन्वयें ठरविण्यांत आल्या नसतील तेंव्हा अशा बंदराच्या हद्दी ठरविणें;

(ब) ज्या उतरण्याच्या जागांस ह्या अधिनियमाचे उपबंध लागूं होतील अशा उतरण्याच्या जागा कोणत्या तें ठरविणें ;

(क) अशा कोणत्याहि उतरण्याच्या जागेच्या हद्दी ठरविणें ;

(ड) ज्या कोणत्याहि बंदरांत हा अधिनियम त्या त्या वेळीं अंमलात असेल अशा बंदरांतून तो अमलांत असण्याचें बंद करणें ;

(इ) अशा कोणत्याहि उतरण्याच्या जागीं—

(१) उतरलेल्या, जहाजांत चढविलेल्या किंवा सांठविलेल्या मालावर, आणि

(२) जलयानावर चढणाऱ्या किंवा त्यांतून उतरणाऱ्या उतारूंवर, आणि

(३) माल आणणाऱ्या किंवा तेथून नेणाऱ्या किंवा तेथें भाड्यासाठीं फिरणाऱ्या जनावरांवर किंवा वाहनांवर, आणि

(४) अशा जागेच्या जवळ येणाऱ्या किंवा बाजूस असणाऱ्या जलयानांवर किंवा बोटीवर, आणि

(५) अशा जागीं किंवा जागेच्या संबंधांत केलेल्या (भारतीय बंदरांबाबत अधिनियम, १९०८ या अन्वयें आकारण्याजोग्या असतील त्या खेरीज करून इतर) कोणत्याहि सेवेबद्दल, आकारावयाची फी ठरविणें :

परंतु, सरकारनें, कोणत्याहि वेळीं, तो माल, उतारूं, जलयान, बोट, जनावर किंवा वाहन ह्या कलमान्वयें फी आकारली जाण्यास पात्र असेल अशा कोणत्याहि मालांस, उतारूंस, जलयानांस किंवा जहाजांस कोणतीहि फी संपूर्णतः किंवा अंशतः माफ करणें हें विधिसंमत असेल. तसेंच उतरण्याच्या जागीं जलयानावर चढण्याच्या किंवा त्यांतून उतरण्याच्या प्रत्येक प्रसंगीं कोणत्याहि उतारूवर घ्यावयाची फी ही एक आण्याहून अधिक असतां कामा नये.

*ह्या अधिनियमाअन्वयेंचे अधिकार व कर्तव्यें हीं कोणी चालवावयाची व कोणी करावयाची तें.*

६. सरकार वेळोवेळीं निदेश देईल अशा अधिकाऱ्यानीं किंवा ह्याबाबतींत सरकार वेळोवेळीं निदेश देईल अशा इसमांनीं, ह्या अधिनियमाअन्वयें आकारावयाची फी आकारली पाहिजे आणि ह्या अधिनियमाअन्वयें किंवा तदन्वयें केलेल्या कोणत्याहि उप-विधिअन्वयें दिलेले इतर सर्व अधिकार चालविले पाहिजेत किंवा लादण्यांत आलेली इतर सर्व कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत.

*फी गोळा करणाऱ्या अधिकाऱ्यांचे अधिकार, विशेष अधिकार व जबाबदाऱ्या.*

७. सीमा-शुल्क कलेक्टर (कस्टम्स कलेक्टर) व त्याच्या हाताखालचे अधिकारी यांस समुद्र सीमा शुल्काच्या संबंधांत, त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि विधीच्या उपबंधांअन्वयें फी, घेण्यासाठीं व ती देण्यास भाग पाडण्यासाठीं जे अधिकार असतील तेच अधिकार, ह्या अधिनियमाअन्वयें फी आकारणें हें ज्या अधिकाऱ्यांचें किंवा इसमांचें कर्तव्य असेल, त्या अधिकाऱ्यास व इसमास असतील, आणि उक्त सीमा शुल्क कलेक्टर व त्याच्या हाताखालचे अधिकारी यांना अशा कोणत्याहि विधीच्या उपबंधांअन्वयें उक्त फी घेण्याच्या व ती देण्यास भाग पाडण्याच्या कामीं त्यानीं केलेल्या कोणत्याहि गोष्टीच्या संबंधांत जे विशेष अधिकार असतील व ज्या जबाबदाऱ्यांस ते पात्र असतील तेच अधिकार असतील व ते त्याच जबाबदाऱ्यांस पात्र असतील.

*अपराध्यांस शिक्षा.*

समुद्र सीमा शुल्क आकारण्यांसंबंधींच्या किंवा ते देण्यासंबंधींच्या अपराधाबद्दल शिक्षेसाठीं व माहिती देणारांस द्यावयाच्या बक्षिसासाठीं त्या त्या वेळीं अंमलांत असलेला विधि हा उक्त फीच्या संबंधांत केलेल्या तशाच प्रकारच्या अपराधास, शक्य असेल तेथवर, लागू असेल.

विशेषतः आणि मागील परिच्छेदांतील उपबंधांच्या सामान्यतेस बाध न आणतां, समुद्र सीमा शुल्क अधिनियम, १८७८ च्या कलम १६७, अनुच्छेद १ च्या तिसऱ्या स्तंभांत विहित केलेला दंड, ह्या अधिनियमान्वयें केलेल्या कोणत्याहि उपविधीच्या उल्लंघनाच्या बाबतींत आकारला पाहिजे.

*फीबद्दलची कोष्टकें लावणें.*

८. ह्या अधिनियमाअन्वयें आकारावयाच्या फीबद्दलचीं कोष्टकें, ज्या उतरण्याच्या जागीं अशा फी आकारतां येत असेल अशा उतरण्याच्या प्रत्येक जागीं ठळक ठिकाणीं, इंग्रजी भाषेंत व तीं बंदरें ज्या जिल्ह्यांत, प्रांतात किंवा प्रदेशांत असेल त्या जिल्ह्याच्या, प्रांताच्या किंवा प्रदेशाचे देशी भाषेंत लावलीं पाहिजेत.

उप-विधी करण्याचा अधिकार.

९. बंदराचा प्रमुख अधिकारी व इंजिनियर, मुंबई राज्य, यांस, सरकारची आगाऊ मंजुरी घेऊन, वेळोवेळीं, ह्या अधिनियमाच्या उपबंधांशीं विसंगत नसतील असे उप-विधि (खालील गोष्टीबाबत) करण्याचा व वेळोवेळीं त्यांत फेरफार करण्याचा किंवा तें रद्द करण्याचा अधिकार आहे :—

(अ) ज्या उतरण्याच्या जागेस हा अधिनियम लागू असेल अशा प्रत्येक जागेच्या उपयोगाचें नियमन करणें ;

(ब) अशा प्रत्येक उतरण्याच्या जागेवरून, जागेवर, जागेजवळ आणि जागेकडे व जागेपासून होणाऱ्या रहदारीच्या व्यवस्थेसाठीं तरतूद करणें ;

(क) ह्या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याहि उपबंधान्वयें आकारावयाची फी गोळा करण्याचें व ती पाठविण्याचें नियमन करणें ; आणि

(ड) सामान्यतः ह्या अधिनियमाच्या अंमलबजावणाशीं संबंध असलेल्या सर्व गोष्टींच्या बाबतींत सर्व इसमांचें मार्गदर्शन करणें. अशा रीतीनें केलेले उप-विधि आणि त्यांत केलेला प्रत्येक फेरफार आणि ते किंवा त्यांचा कोणताहि भाग रद्द करणारा प्रत्येक आदेश हा, राजपत्रांत प्रसिद्ध केला पाहिजे.

[१०-११-१२.] हीं कलमें सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ५५ अन्वयें गाळण्यांत आलीं.